# पाणी खोल खोल आहे



वर्ष संपत आलं, कसं भू....र्..कन उडून गेलं. असं प्रत्येक वर्षी होतं. गेलेल्या दिवसाच्या आठवणी पुन्हा एकदा मनात गर्दी करतात. वाटतं...

कसे गेले ते दिवस
आनंदाच्या वर्षावात
किती उन्हाळे पाहिले
पावासाळी आठवात

कधी वरती भरूनी
मेघ आले मेघ गेले
आड कवडसा माझा
त्याने मजला पाहीले

शिशिराचा काटा आला
पानापानात गळती
स्वप्ने उद्याची पहावी
त्याला नाही हो गणती

पाणी खोल खोल आहे
वर तरंग इवले
कसे गेले ते दिवस
डोहामध्ये बुडलेले

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/